महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम
१९८१ या कायदयाची अंमलबजावणाी करण्यासाठी
खाजगी नौका भाडयाने देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-१००१/प्र.क्र.४६/पदुम-१४**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-१९ ऑक्टोबर,२००१.**

**प्रस्तावनाः-**

महाराष्ट्रातील पारंपारिक मच्छिमारांचे हित जोपासण्यासाठी तसेच परप्रांतीय मच्छिमारांची महाराष्ट्राच्या जलाधीक्षेत्रात अवैध मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी अधिनियम १९८१ हा कायदा अंमलात आणण्यात आला आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता केंद्र शासनाच्या १०० टक्के अर्थसहाय्यातून चार वेगवान गस्तीनौका बांधून घेण्यात आल्या असून सद्यस्थितीत सदर गस्तीनौका त्वारील कर्मचारीवृंदाची निर्मिती होईपर्यंत एजन्सीतत्वावर कार्यरत करण्यात आलेल्या आहेत. सदर गस्तीनौका चालविणे व त्यांची देखभाल यासाठी येणारा वार्षिक खर्च हा जवळ जवळ १.०० कोटी इतका आहे. या शिवाय या बोटी सुस्थितीत ठेवण्याकरिता दर एक ते दिढ वर्षांतून बोटींचे ड्राय डॉकींग करन घेणे आवश्यक असते व यासाठी अंदाजे खर्च प्रती बोट १५ ते २० लाख इतका आहे. सदर नौकांसाठी नियमित कर्मचारीवृंदाची निर्मिती केल्यास यासाठी वार्षिक अंदाजे ५० लाखाचा आवर्ती खर्च येईल. सदरचा खर्च हा फारच जास्त असल्याने सदरच्या चार गस्तीनौका ऐवजी खाजगी नौका भाडयाने घेतल्यास याबाबतचा खर्च हा अंदाजे वार्षिक ५० लाखापर्यंत येवू शकतो व त्यामुळे शासनाची वार्षिक ५० लाखांची बचत होईल. ही वस्तुस्थिती लक्षात घेवून चार गस्तीनौकांएवजी खाजगी नौका घेण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

महाराष्ट्रातील पारंपारिक मच्छिमारांचे हित जोपासण्यासाठी, महाराष्ट्राच्या जलधी क्षेत्रातील अवैध मासेमारीस आळा घालण्यासाठी तसेच महाराष्ट्र सागरी नियमन अधिनियम १९८१ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या १०० टक्के

अर्थसहाय्यातून ४ वेगवान गस्तीनौका बांधून घेण्यात आलेल्या आहेत. सदर गस्तीनौका चालविण्यासाठी तसेच त्यांची देखभाल करण्यासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारीवृंद नसल्याने या नौका सप्टेंबर,१९९८ पासून एजन्सीतत्वावर चालविण्यासाठी देण्यात आलेल्या आहेत. सदर गस्तीनौका चालविण्यासाठी तासाला ६५ लिटर डिझेल लागतें. या नौका गस्तीसाठी वारात नसल्या तरी नौका व नौकेचे इंजिन सुस्थितीत ठेवण्याच्यादृष्टीने काही ठराविक वेळेसाठी नौकेचे इंजिन चालू ठेवणे व त्यासाठी मोठया प्रमाणात डिझेल खर्च करणे आवश्यक असते. तसेच सद्यस्थितीत नौका चालविणारा कर्मचारीवृंद हा त्या कंत्राटदारामार्फत नियुक्त करण्यात येतो. सदरचे कमर्चारी हे नौकेचे व्यवस्थित काळजी घेत नसल्याचे निदर्शनात आले आहे. त्यामुळे या नौकांची वरचेवर दुरुस्तीची कामे असून दुरुस्तीच्या खर्चात मोठया प्रमाणात वाढ होत आहे. मत्स्यव्यवसाय विभागाच्या गस्तीनौका चालविणे व त्याची देखभाल करण्याचा अनुभव असलेले तांत्रिक अधिकारी नसल्याने व नियंत्रण ठेवणे कठीण आहे. त्यासाठी नवीन पद निर्मिती केली तरी योग्य पात्रता असलेले अनुभवी कर्मचारी मिळतील याची शाश्वती नाही.यास्तव या चार गस्तीनौका चालविण्यासाठी व देखभालीसाठी कंत्राटदाराबरोबर करण्यात आलेला करार तात्काळ संपुष्टात आणून शासनाच्या स्वतःच्या गस्तीनौका चालविणे बंद करण्याची शासनाची मान्यता देण्यात येत आहेत.

२. शासनाच्या गस्तीनौका चालविणे बंद केल्यानंतर महाराष्ट्रातील पारंपारिक मच्छिमारांचे हित जोपासण्यासाठी तसेच परप्रांतीय मच्छिमारांची महाराष्ट्राच्या जलधीक्षेत्रातील अवैध मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र सागरी नियमन अधिनियम १९८१ या कायद्याची प्रभवी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या जलधीक्षेत्रात गस्त घालण्यासाठी चार खाजगी नौका भाडयाने घेण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. केंद्र शासनाच्या १०० टक्के अर्थसहाय्यातून घेण्यात आलेल्या गस्तीनौका केंद्र शासनास परत करणे किंवा विकण्यास मान्यता देण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. शासनाच्या गस्तीनौका केंद्र शासनास परत करण्याबाबतची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत या नौका मरीन इंजिनियर किंवा सक्षम अशा तांत्रिक अधिकाऱ्याच्या सल्ल्याने सुरक्षित ठिकाणी भूमिस्थ करुन (grounded) ठेवण्यात येतील व त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित जिल्हयांचे सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांची राहील. सदर नौका चालविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेला कंत्राटदारासोबतचा करार आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी तात्काळ संपुष्टात आणावा. तसेच या नौकांवर कोणत्याही प्रकारचा खर्च १.११.२००१ नंतर करण्यात येवू नये.

४.    महाराष्ट्र जलधी क्षेत्रात गस्त घालण्यासाठी खाजगी नौका भाडयाने घेण्यासाठी निविदा काढण्याचे आयुक्त मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच सदर निविदांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १.. | आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई | अध्यक्ष |
| २. | उपसचिव वित्त विभाग | सदस्य |
| ३. | उपसचिव मत्स्यव्यवसाय | सदस्य |
| ४. | उपसंचालक (सागरी) | सदस्य सचिव |
| ५. | सागरी अभियंता,महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई | सदस्य |
| ६. | प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक,मुंबई | सदस्य |

सदरची कमिटी प्राप्त झालेल्या निविदांची छाननी करुन त्या अंतिम करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करेल व याबाबतचा निर्णय शासनस्तरावर मत्स्यव्यवसाय विभागामार्फत घेतला जाईल. गस्तीच्या भाडयाने घ्यावयाच्या खाजगी नौकांचे तांत्रिक निकष (Technical Specification) तसेच अटी व शर्ती सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहतील.

६.    गस्तीनौका भाडयाने घेण्यासाठी येणारा खर्च खालील लेखाशिर्षातर्गत सन २००१-०२ मध्ये उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा.

मागणी क्र.डी-७
२४०५-मत्स्यव्यवसाय
१०३-सागरी मत्स्यव्यवसाय,
(०१) (०२) मासळी उतरविण्यासाठी केंद्रे (२४०५ ०२६२)
२० इतर खर्च

७. आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी गस्तीनौकांच्या कामाचा नियमित आढावा घेऊन त्याबाबतचा आपला अहवाल प्रत्येक तिमाही अखेर शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(श्या.ना.धकाते),
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-२
मत्स्यव्यवसाय उपसंचालक (सागरी),मत्स्यव्यवसाय आयुक्तालय,मुंबई
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक (सागरी जिल्हे)
सर्व सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, (सागरी जिल्हे)
महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१,मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
निवासी लेखा अधिकारी,मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे/रायगड(अलिबाग)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग(ओरस)
उपकोषागार अधिकारी,मालवण,जि.सिंधुदुर्ग व पालघर,जि.ठाणे
नियोजन विभाग,
कक्ष अधिकारी (पदुम-१२,१३ व १६)कृषि व पदुम विभाग
निवडनस्ती